ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-I June 2013

# महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाच्या समस्या

प्रा. सरिता भिका जाधव,
समाजशास्त्र विभाग,
कर्म. शांतारामबापू कोंडाजी वावरे महाविद्यालय,
उत्तमनगर, सिडको नाशिक.

भारतीय साखर उद्योगाचा प्रारंभ साधारणपणे १९०३ च्या सुमारास झाला. बिहार व उत्तरप्रदेशात प्रत्येकी एक साखर कारखाना सुरु झाला. १९३१ मध्ये देशभरात एकूण ३१ कारखाने सुरु झाले. १९३१ मध्ये जकात संरक्षण कायदा पास झाला व त्यामुळे देशभरात साखर कारखान्यांची संख्या प्रचंड वाढली. १९३७ मध्ये एकूण कारखान्यांची संख्या १३७ झाली व भारत साखरेच्या बाबतीत आत्मनिर्भर होउ लागला. उत्तर भारतात उस हे रोखीचे पिक मानले गेल्याने साखर कारखान्यांचे स्थानीकरण प्रामुख्याने बिहार व उत्तर प्रदेशात अधिक प्रमाणात घडून आले. १९३६ पर्यंत ८५ टक्के साखर उत्पादन हे हया दोन राज्यांमधून होत होते. १९६०–१९६१ पर्यंत या राज्यांचा साखर उत्पादनातील वाटा ६० टक्क्यांपर्यंत होता. त्यानंतर मात्र महाराष्ट्र , तामिळनाडू, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या राज्यांमध्ये साखर कारखानदारीची वेगाने वाढ झाली. हया राज्यांची गाळपक्षमता तुलनेने बिहार व मध्य प्रदेशापेक्षा जास्त व उत्पादन खर्च मात्र कमी असल्याने साखर उद्योग उर्जितावस्थेला आला. ३० जून २००१ मध्ये देशातील साखर कारखान्यांची संख्या ५०६ झाली. १९५०–५१ मध्ये ती १३८ होती. साखर उद्योग हा देशातील शेतीमालावर आधारित असा दुस–या क्रमांकाचा उद्योग बनला.

ब्राझिल व क्युबा ला भारताने साखर उत्पादनात मागे टाकले. भारत हा जगातील साखर उत्पादन करणारा चौथा अग्रगण्य देश आहेत्र रशिया, ब्राझिल,क्युबा व भारत अशी क्रमवारी आहे.[१] साखर उद्योगासाठी मोठया प्रमाणावर अनुकुलता असून सुध्दा भारतातील साखर उद्योग सहकाराकडून पुन्हा भांडवलशाहीकडे वाटचाल करु लागला आहे. यशवंतराव चव्हाणांसारख्या नेत्यांनी जाणीवपूर्वक महाराष्ट्रात सहकार क्षेत्राच्या वाढीसाठी प्रयत्न केले. पुढे इतर अनेक नेत्यांनीही सहकार क्षेत्राच्या वाढीजा उत्तेजन दिले. सहकार हे सत्ताधारी पक्षाच्या हातातील सत्ता टिकविण्याचे सर्वात प्रभावी साधन बनल्याने सहकार क्षेत्राला महाराष्ट्रात राजाश्रय मिळाला. परिणामी सहकार क्षत्राने १९६० ते १९८० या दशकांमध्ये मोठी भरारी मारली. १९९० च्या दशकामध्ये भारतीय अर्थव्यवस्था संकटात सापडल्यानंतर तिला त्यातून बाहेर काढण्यासाठी खजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या धोरणाचा स्विकार करण्यात आला.

त्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत अनेक मुलभूत बदल घडून आले. या बदललेल्या धोरणांमुळे खाजगी क्षेत्राचा विस्तार घडून येण्यास सुरुवात झाली. त्याचा अपरिहार्य परिणाम म्हणून सहकार क्षेत्रापुढे खाजगी क्षेत्रांच्या स्पर्धेला म्हणजे व्यापक अर्थाने उदारीकरणाने निर्माण केलेल्या परिस्थितीला तोंड देण्याचे आव्हान निर्माण झाले. सहकार क्षेत्रातील अंतर्गत समस्या व उदारीकरणाने निर्माण केलेली आव्हाने अशा दुहेरी संकटाचा प्रतिकूल परिणाम घडून आला. या दुहेरी आव्हांनामुळे सहकार क्षेत्रापुढे अस्तित्वाचे आव्हान निर्माण झाले आहे.[२] महाराष्ट्रात सहकारी साखर उद्योग गलितमात्र झाला आहे. कारण साखरेचे घसरेलेले भाव, शिल्लक साखरेचे विक्रमी साठे, उसाच्या हमीभावाच्या आंदोलनामुळे कारखान्यांची झालेली कोंडी, काही नैसर्गिक आपत्ती यामुळे कारखाने डबघाईला आले. ५१ कारखाने आजारी झाले. २००४–०५ मध्ये एकूण १९० साखर कारखान्यांपैकी केवळ ७० कारखान्यांचा खर्च वजा जाता अधिक रक्कम मिळाली. १६ कारखाने दिवाळखोरीच्या काठावर होते. १७ कारखाने खरोखर आजारी होते तर ७७ कारखाने बंद पडले होते. १९७० च्या दशकात तोटयात असलेले अनेक खाजगी साखर कारखाने स्थानिक उस उत्पादकांनी खरेदी करुन त्यांचे रुपांतर सहकारी साखर कारखान्यात केले आणि ते नफ्रयात चालविले. आता मात्र विपरित परिस्थिती आढळते आहे. कारण तोटयात असलेले काही सहकारी साखर कारखाने खाजगी उद्योजकांनी भाडेतत्वावर चालवायला दिले आहेत. साखरेचे विक्रमी साठे, घसरलेले भाव, किमान भावासाठी शेतक–यांना दबाव, नियोजनाचा अभाव, भ्रष्टाचार, गैरव्यवहार, राजकारण व सत्ता स्पर्धा इत्यांदीमुळे अनेक सहकारी साखर कारखाने तोटयात गेले आहेत. २००६–२००७ च्या हंगामात देशात १८० लाख टन साखर उत्पादन झाले. त्याआधीच्या वर्षी शिल्लक साठा ५० लाख टन होता. त्यामुळे एकूण ३११ लाख टन साखर विक्रीसाठी उपलब्ध झाली. त्यापैकी देशांतर्गत १९७ लाख टन व निर्यातीसाठी १० लाख टन साखर खपली व १११ लाख टन साखर शिल्लक राहिली. महाराष्ट्रात ३७ लाख टनापेक्षा अधिक साखर शिल्लक राहिली. शिल्लक साखरेचा साठा, वाहतुकीचा खर्च, व्याज, साखरेची घसरणारी प्रत यामुळे साखर उद्योगापुढील अडचणी वाढतच आहेत. अनेक अभ्यासकांनी हया अडचणींचा उहापोह करण्याचा प्रयत्न केला आहे. श्री. माला लालवाणील यांनी समाजप्रबोधन पत्रिका जुलै / सप्टेंबर २००७ च्या अंकात 'महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योग – सरकारी नियमांचे शुल्ककाष्ठ' हया लेखात यासंबंधी भाष्य करतांना असे म्हटले आहे की, साखर उद्योगाच्या आजारामागे साखर उद्योगातील काळाबाजार हे एक महत्वाचे कारण आहे. हा काळा बाजार सुरु होण्यास दोन महत्वाच्या घटना कारणीभूत आहेत.[३]

१९७७ च्या सार्वत्रिक लोकसभा निवडणूकीत इंदिरा गांधी व कॉंग्रेस पक्षाचा मोठा पराभव झाला व मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखालील जनता पक्ष सत्तेवर आला. नव्या सरकारने साखर नियंत्रण मुक्त

ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे साखरेच्या किमतीत नाटयमय घसरण झाली. अडीच रुपये किलो इतक्या स्वस्त दराने साखर विक्री झाली. साखरेचे भाव कोसळल्यामुळे त्याचा परिणाम पुढील वर्षी उसाची लागवड कमी होण्यात झाली. उस पुरवठा कमी झाल्याने साखर उत्पादन घटले, त्यामुळे साखरेचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला. चलनवाढ नियंत्रणात ठेवण्यासाठी केंद्र सरकारने साखरेच्या कमाल किमतीवर मर्यादा घातली. बाजारात साखर टंचाईमुळे साखरेची मागणी अधिकच वाढली. व्यापा—यांनी साखर कारखान्याच्या मालकांना ऑन मनी देउ केला. हा ऑन मनी सरकारने ठरवून दिलेल्या भावापेक्षा कितीतरी अधिक होता. व इथूनच साखर उद्योगात काळया बाजाराची सुरुवात झाली. दुसरी महत्वाची घटना म्हणजे १९८० मध्ये महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदी बॅ.अ.र.अंतुले यांची झालेली निवड होय. अंतुलेना सहकाराशी काहीच देणे घेणे नव्हते. त्यांनी इंदिरा गांधी प्रतिभा प्रतिष्ठान ची स्थापना केली व त्या प्रतिष्ठानाला सहकारी साखर कारखाने व इतर सहकारी संस्थांनी देणग्या द्याव्यात यासाठी दडपण आणले. अंतुलेचे अनुकरण सहकारातील नेत्यांनी करुन अनेक प्रतिष्ठाणे स्थापन केली व यामुळेही महाराष्ट्रात व एकूणच सहकारी क्षेत्रात आवांछनीय असा भ्रष्टाचार सुरु झाला.[४] साखर उद्योगाची दुरावस्था होण्यास पुढील समस्या कारणीभूत आहेत.

**१. लेव्ही साखरेच्या सक्तीमुळे साखर उत्पादनातील चढउतारा :**

कधी संपूर्ण नियंत्रण, कधी अंशत: नियंत्रण तर कधी संपूर्ण मुक्त अशा धरसोडीच्या धोरणाचाही साखर कारखान्याच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो. यासंदर्भात लेव्ही साखरेबरबत अनिश्चितता उस उद्योगातील समस्या वाढविण्यास हातभार लावते. सुरुवातीच्या सर्वच राज्यांमध्ये साखर उत्पादन घेतले जात नव्हते. अशा राज्यासाठी रास्त भावाने साखर उपलब्ध करुन देण्यासाठी लेव्ही साखरेची योजना होती. त्यातही सुरुवातीला सर्व साखर लेव्ही म्हणून द्यावी लागे. साखर कारखान्यांनी उत्पादित केलेल्या साखरेपैकी काही साखर शासनाला लेव्ही म्हणून द्यावी लागते. लेव्ही साखरेचा भाव बाजारातील खुल्या साखरेपेक्षा कमी असतो. हीच लेव्ही साखर नियंत्रण दराने स्वस्त किमत दुकानातून जनतेला वितरीत करण्यात येते. भारतात साखर उद्योग हा नियंत्रित स्वरुपाचा होता. मात्र ही नियंत्रणे सोयिस्करपणे शिथिल किंवा कठोर करण्यात आली. १९७७ मध्ये जनता सरकारने साखर उद्योगावरील नियंत्रणे शिथिल केली. संपूर्ण खुले धोरण स्विकारले. म्हणजेच लेव्ही ही संकल्पना रद्द केली. त्यामुळे साखर १०/— रु. किलो झाली. परिणामी साखरेबाबत अतिसुकाळ निर्माण झाल्याने साखर वितरणाबाबत अनेक विपरित आपत्ती उदभवल्या. साखरेच्या मासिक कोटयावरील मर्यादा शिथील केल्याने साखरेच्या भावाबाबत एकदम अनिश्चितता निर्माण झाली. म्हणून १९७९ पासून कॉंग्रेस सरकारने साखरेबाबत दुहेरी किमतीचे धोरण स्वरकारले. त्यासाठी लेव्ही

चा कोटा ठरवून देण्यात आला. सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारा लेव्ही साखरेचे वाटप ठरवले गेले. १९९१ ते १९९३ पर्यंत हे प्रमाण ४०–६० पर्यंत होते. १९९३ ते २००० पर्यंत हे प्रमाण ३०–७० पर्यंत होते. २००१ पासून पुढे १ फेब्रूवारी २००१ हे प्रमाण १५–८५ पर्यंत होते.[५]

सुरुवातीला लेव्ही साखरेचे प्रमाण कमी होते. कारण उत्तर पुर्वेकडील काही राज्ये, पर्वतीय राज्ये यांचा अपवाद वगळता इतर राज्यात दारिद्रय रेषेवरील कुटुंबाना सार्वजनिक वितरण व्यवस्था (PDS – Public Distibution System ) मार्फत साखर पुरविली जात नव्हती. व त्यामुळे हया लोकसंख्येला खुल्या भावाने साखर उपलब्ध करुन देण्याच्या पध्दतीमुळे लेव्ही साखर कोटा कमी ठेवण्यात आला होता. ३१ ऑगस्ट रोजी साखर कारखाना परवानापध्दत रद्द झाली. साहजिकच साखर कारखानदारीत त्यामुळे प्रचंड वाढ झाली नवीन कारखान्यांना लेव्ही दरात सुट मिळू लागली. त्याचे अनेक दुष्परिणाम साखर कारखानदारीला भोगावे लागले. अतिरिक्त साखर उत्पादनाचे संकट निर्माण झाले.

एप्रिल १९९८ मध्ये भारत सरकारने बी.बी. महाजन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने साखर उद्योगाच्या अरिष्टाबाबत पुढील शिफारशी केल्या.

१. संपूर्ण शिथीलीकरण
२. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत होणा–या साखर वाटपाची समाप्ती
३. Statutory Minimum Price साठी साखर भाव मंडळाची स्थापना (SPB : Sugar Pricing Board )
४. प्रस्थापित साखर कारखाना व नवा कारखाना यामधील अंतराची मर्यादा कमीत कमी १५ कि मी
५. किमती स्थिर राहण्यासाठी आयातीचे निश्चित धोरण
६. नवीन साखर कारखान्यांच्या सवलतीवर निर्बंध

**२. उस दराच्या राजकारणामुळे कारखान्यांच्या अडचणीत वाढ**

केंद सरकार उसाची किमान किंमत ठरवून देत असते. त्यास SMP वैधानिक किमान किंमत म्हणतात. (SMP – Statutory Minimum Price ) उस उत्पादक शेतक–याला त्याच्या पिकाचा उत्पादन खर्च भरुन निघेल अशा पध्दतीने उसाची किंमत शासनाकडून ठरविली जाते. १९१० मध्ये इंडियन टेरिफ बोर्डाच्या बैठकीत वैधानिक किमान किंमत ही संकल्पना मांडण्यात आली. भारतात सहकारी साखर कारखाने सुरु होण्याआधी खाजगी साखर कारखानदार शेतक–यांच्या उसाला कमी किंमत अदा करुन शेतक–यांची पिळवणूक करीत असत व उत्पादित साखर मात्र अधिक भावाने विकून भरमसाठ नफा कमवित असत.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-I June 2013

शेतक—यांची पिळवणूक थांबविण्यासाठी या बैठकीमध्ये चर्चा होउन वैधानिक किमान किमतीची पार्श्वभूमी तयार करण्यात आली. अर्थात ही वैधानिक किंमत यंत्रणा फक्त 'उस' व 'ताग' हया दोनच शेतमालांना लागू आहे. ६ तसेच ही किंमत बंधनकारक नसते. अलिकडे मात्र १९६६ च्या शुगरकेन कंट्रोल ऑर्डर मधील एस एम पी ची तरतूद रद्द करुन Fare Reasonable Price एफ. आर. पी. म्हणजे योग्य व किफायतशीर किंमत ही नवीन संकल्पना घोषित करण्यात आली. याबरोबरच राज्य सरकारदेखील राज्याची एकंदर परिस्थिती लक्षात घेउन उसाचा दर निश्चित करीत असते. त्यास SAP (State Advised Price) राज्य निर्धारित किंमत म्हणतात. प्रत्यक्षात SMP पेक्षाही SAP ही जास्त असते. साखरेचा भाव ठरविणे हा राजकीय प्रतिष्ठेचा भाग झाला आहे. १९९३ —९४ मध्ये SMP ३४.५० वर SAP मात्र ३६ रुपये होती? साखर कारखाने हे राजकारण प्रवेशाची खात्रीशीर वाट असल्याने राज्य सरकारमधील सत्ताधारी पक्षाचा SAP वाढवून देण्याकडे कल असतो. साहजिकच त्यामुळे केंद्र सरकार व राज्य सरकार यांच्यात तेढ वाढू लागते व शासकीय नियंत्रणे देखील कठोर होउ लागतात. ब—याच वेळेला मतदार उस उत्पादक शेतक—यांना खूष ठेवण्यासाठीही उसाचे भाव जाणीवपूर्वक वाढवले जातात. [७] त्याचा परिणाम कारखान्यापुढील अडचणी वाढण्यात झाला.

**३. मर्यादित गाळप क्षमता व कमी साखर उता—यामुळे कारखान्यांची पिछेहाट :**

भारतात साखर कारखान्यांची गाळपक्षमता रोज १५०० (taped) इतकी आहे. थायलंडमध्ये हे प्रमाण १०,००० (taped) आहे. अर्थात यासाठी जुनी यंत्रसामुग्री विशेषत: युपी व बिहार या राज्यांमध्ये असल्याने गाळप कमी होते दृ तसेच भारतात साखर उतारा देखील खूप कमी आहे. प्रतिटन उसाचे गाळप झाल्यानंतर तयार होणारी साखर म्हणजे साखर उतारा होय. एक टन उस गाळून १२० किलो साखर तयार झाली असेल तर साखर उतारा १२ असतो. इतर देशात १३ ते १४ टक्के आहे व भारतात मात्र तो ९.५ टक्के इतकाच आहे. साखर उतारा मी असण्यामागे उसाच्या सुधारीत जातींचा अभाव, भारतातील अनियमित स्वरुपाचे हवामान वाहतूक व्यवस्थेतील त्रृटी आणि एकूणच भारतीय शेतीचे पारंपारिक स्वरुप इत्यादी गोष्टी कारणीभूत आहेत. परिणामी कारखान्यांची पिछेहाट होउ लागली.

**४. साखर आयातीबाबतच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेमुळे निर्माण होणारी आगतिकता :**

साखरेची स्वस्त आयात ही साखर उद्योगाची कठीण समस्या आहे. भारतात साखरेचे शिलकी साठे असतांनाही आंतरराष्ट्रीय परदेश नितीचा भाग म्हणून साखर आयात सुरुच राहिली. पाकिस्तान, ब्राझील, युरोपियन संघटना यांना साखर निर्यातीवर भरपूर अनुदान असल्याने त्यांचा उत्पादन खर्च जास्त असुनही

त्यांच्याकडून मोठया प्रमाणात साखर निर्यात होउ लागली व देशी साखरेला त्याचा मोठा पफटका बसला. १९९७–९८ ते १९९९–२००० पर्यंत साखर आयातीचे प्रमाण जास्त होते. आयात साखरेच्या किंमती देशी साखरेपेक्षा कमी असल्याने शिवाय आयात शुल्क कमी, लेव्ही साखरेचे बंधन नाही यामुळे साखर आयात ही घटना देशातील साखर उद्योगाला मारक ठरली. साखरेबाबत हया अरिष्टांसदर्भात काहीतरी उपाययोजना करण्याची निकड भासू लागली. त्यातून डिसेंबर १९९९ पासून आयात शुल्क हे १७.५ पासून ४० टक्क्यांपर्यंत आणि ९ फेब्रूवारी २००० पासून ६० टक्क्यांपर्यंत झाले.

**५. शिलकी साखर साठयांमुळे वाढता अपुरा दुरावा :**

भारतात साखरेच्या उपभोगापेक्षा साखरेचे उत्पादन जास्त आहे. त्यामुळे दरवर्षी साखरेचे शिलकी साठे सतत वाढत आहेत. त्यातून अपूरा दुरावा निर्माण झालेला आहे. जागतिक पातळीवरचा साखरेचा उपभोग वाढणे आवश्यक आहे व त्याचबरोबर साखरेची निर्यातही वाढणे अपेक्षित आहे. प्रत्यक्षात मात्र भारत आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत साखर व्यवहारात उतरत आहे अशी नुसती बातमी आली तरी साखरेचे भाव कमी होउ लागतात. त्यामुळे भारताला देशाबाहेर साखर विकता येत नाही. परिणामी ती साखर देखील देशातच पडून राहते व साखरेचा अतिरिक्त साठा आणखीन वाढू लागतो. साखर किमती घसरल्या की गुळाच्या किमती वाढतात व साखरेचा उत्पादन खर्च परवडेनासा होतो कारण गुळ उत्पादनात थोडे असले तरी गुळाचा भाव मात्र जास्त असतो आणि साखर उत्पादन अधिक असून साखरेचा भाव मात्र कमी असतो. साखर उत्पादनात सुरुवातीला बिहार व उत्तर प्रदेश ही दोनच राज्ये आघाडीवर होती. परंतु १९६० नंतर इतरही राज्यांमधून विशेषत: महाराष्ट्र आंध्र, कर्नाटक, तामिळनाडू हया दक्षिणेकडील राज्यांनी साखर उत्पादनात आघाडी घेतली. हया राज्यातील हवामान उस पिकासाठी अधिक अनुकूल होते. शिवाय जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध होत्या व सर्वात महत्वाचे म्हणजे राजकारणात हया राज्यांमधील व्यक्तींही अग्रेसर होत्या. साहजिकच याचा परिणाम साखरेचे अधिकाधिक साठे वाढण्यात झाला.

**६. घटत्या उस उत्पादनामुळे उदभवणारे उस दर वाढीचे संकट :**

उस हे हंगामी पिक आहे. शिवाय उसाला भरपूर प्रमाणात पाणी लागते. अतिरिक्त साखर उत्पादनामुळे साखरेचे साठे वाढत गेले. परिणामी पुढच्या हंगामात साखर कारखान्यांकडून उस घेण्याबाबत दिरंगाई होउ लागली. शेतक–यांनी उसाची पिके नष्ट केली. शिवाय इतरही कारणांमुळे उस उत्पादन घेणे अडचणीचे ठरु लागले. कारखान्याकडून उसाचा भाव ठरलेल्या मुदतीत न मिळाल्याने शेतक–यांमध्ये नैराश्य येउ लागले. उस पिकाऐवजी द्राक्षे, डाळींबे, कांदे यासारखी रोखीची पिके सोयीची वाटू लागले. एकंदरच उस क्षेत्र कमी

झाल्याने गळीत हंगाम देखील कमी होउ लागला.[८] गळित हंगामात कारखाना चालू ठेवण्यासाठी कारखाना परिक्षेत्राबाहेरुन जादा दर देउन उस खरेदी करण्याचे आव्हान कारखान्यासमोर उभे राहिले. जादा उसदर द्यावा लागल्याने साखरेचा उत्पादन खर्च वाढला. परिणामी तोटा वाढून कारखान्याच्या कर्जात वाढ होत गेली.

**७. सहउत्पादक पदार्थ निर्मितीबाबतच्या अनास्थेमुळे न घटणारा उत्पादन खर्च :**

साखर उत्पादनात निर्माण होणारे दोन अनिवार्य उपपदार्थ म्हणजे चिपाड व मळी. चिपाडापासून इंधन, कागद वगैरे निर्माण केले जाउ शकतात. मळीपासून अल्कोहोल निर्मिती होउ शकते. जवळपासच्या क्षेत्रातील कारखान्यांनी ठरविल्यास या दोन्ही उपपदार्थांपासूनही नफा मिळविता येतो. त्यातून साखरेचे भाव नियंत्रणात राहू शकतात. परंतु बहुतेक कारखान्यांमध्ये चिपाड व मळीचा उपयोग केला जात नाही. त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा विकसित करुन देखील थोडयाच दिवसात ही यंत्रणा बंद पडते. म्हणजेच साखरेचा उत्पादन खर्च कमी होण्यास हातभार लावणा—या हया उपपदार्थांचा कारखान्यांना फायदा होण्याऐवजी नुकसान होउ लागते. कारखान्यांनी सहवीज निर्मिती प्रकल्प राबविल्यास वीजटंचाईचे संकट दूर होउ शकते. मात्र असे प्रकल्प देखील पुरेशा कार्यक्षमतेने राबविले जात नाहीत. म्हणजे महागडी यंत्रसामुग्री खरेदी करुनही त्याचा लाभ घेतला जात नाही.

**८. साखर घोटाळयामुळे कर्जात होणारी वाढ :**

डसाचा भाव ठरविणे, साखरेचा भाव ठरविणे, कारखाना चालू राहण्यासाठी शासनाकडून विविध अनुदाने मिळविणे या बाबतीत गैरव्यवहार होण्यास कारखान्यात मोठाच वाव असतो. मोठे व्यापारी, दलाल, सहकारी पतसंस्था यांच्याद्वारे साखरेच्या खरेदी विक्रीत अनेक घोटाळे होउ शकतात. साखरेचा काळाबाजार सुरु होतो. निवडणूक प्रक्रियेतील अनेक अवांछनिय प्रकार सुरु होतात. भ्रष्टाचाराला अनेक संधी उपलब्ध होतात. एकूणच साखरेचे गैरव्यवहार मोठया प्रमाणात घडू लागतात. याबाबत डॉ. गिरीधर पाटील २००९, 'साखर उद्योग वाचवायचा असेल तर' या लेखात असे म्हणतात की, भ्रष्टाचाराची एकूण प्रकल्प भांडवलात प्रवर्तकाचा सभासद भाग भांडवलाच्या स्वरुपात फक्त १० टक्के वाटा असतो. त्यातही शासन अनुसुचित जाती व मागासवर्गीय सभासदांना अनुदान देते. इतर सभासदांना कर्ज देते. शासन स्वत: ३० टक्के भाग भांडवल ओतते. राहिलेले ६० टक्के इतर वित्तीय संस्थांकडून उभारायचे असतात. या कर्जाला राज्य शासनाची हमी असते. यावरुन लक्षात येईल की प्रवर्तकाने नगण्य स्वरुपात उभारलेल्या वा उभारण्याच्या आश्वासनावर त्याला एवढया प्रचंड रकमांचे व्यवहार करता येतात. गळीत हंगामातही मिळणारे पूर्वहांमी कर्ज व त्यातून होणारी प्रचंड खरेदी यावरही नियंत्रण नसल्याने भ्रष्टाचाराची संधी निर्माण होतात.[९] त्यातून कारखान्याची कर्ज सतत वाढत राहतात.

**९. जागतिकीकरणाचा भारतीय शेतीवरील प्रतिकूल प्रभाव :**

१ जानेवारी १९९५ रोजी अमेरिका व इतर साम्राज्यवादी देशांनी जागतिक व्यापार संघटना स्थापन केली. या व्यापार संघटनेत सहभागी होण्यासाठी आपल्या दमनशक्तीचा पुरेपूर वापर केला. अनेक छोटया छोटया राष्ट्रांना या संघटनेत सहभागी होण्याखेरीत पर्यायच शिल्लक राहू नये अशी त्यांची कोंडी केली. भारत सरकारने ३०डिसेंबरने १९९४ रोजी या करारावर सही करुन भारतीय अर्थव्यवस्थेला आणि खास करुन शेती व्यवस्थेला संकटात लोटून दिले असल्याचे मत एन.डी.पाटील २००२ यांनी मांडले आहे.

डंकेल प्रस्तावानुसार नव्या मुक्त अर्थव्यवस्थेत सहभागी झालेल्या व पेचप्रसंगात सापडलेल्या अविकसित राष्ट्रांना पुढील गोष्टी अमलात आणणे बंधनकारक होते.

१. आयात व्यापारातील अडथळे दूर करुन आयातीला पोषक वातावरण निर्माण करणे.
२. राष्ट्रीय चलनाचे अवमूल्यन करणे.
३. परकीय भांडवलाच्या गुंतवणूकी बाबतचे एकूण एक निर्बंध दूर करणे.
४. वेतन कपात करणे, शासनाच्या वतीने केल्या जाणा–या खर्चामध्ये कपात करणे.
५. शासनाच्या पुढाकाराने अस्तित्वात आलेल्या सार्वजनिक मालकीच्या उपक्रमांचे खाजगीकरण करणे.
६. शासनाने खुल्या बाजारपेठेला उत्तेजन देणे.
७. देशांतर्गत वस्तुंच्या उत्पादनावर आकारण्यात येणा–याप अबकारी करात लक्षणीय वाढ करावी, जेणेकरुन त्या वस्तुंचा देशांतर्गत खपक मी व्हावा व त्या वस्तुंची जास्तीतजास्त निर्यात व्हावी.

या उपाययोजनांखेरीज खते, वीज, पाणी यावरील सबसिडी कमी करणे बंधनकारक होते. वास्तविक विकसित देशांच्या तुलनेत भारतीय शेतीला मिळणारी सबसिडी अतिशय अल्प असल्याचे पुढील तक्त्यारुन दिसून येईल.

**सारणी क्रमांक १.५.१.**

**विकसित देशांतर्फे देण्यात येणारी सबसिडी**

| देश | एकूण कृषिउत्पन्नाच्या प्रमाणात टक्के |
|---|---|
| जपान | ७२.५ |
| कोलंबिया | ५४.० |
| चीन | ३४.० |
| अमेरिका | २९.३ |
| भारत | ०३.३ |

या तक्यावरुन असे लक्षात येते की, बडी राष्ट्रे शेतीला प्रचंड अनुदाने देत आहेत. भारतात मात्र शेतीला सबसिडीवर नाहीच पण शेतीमालाच्या किमती आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किमतीपेक्षा वर्षानुवर्षे कमी ठेवण्यात आल्यामुळे भारतीय शेतीला संरक्षण नाही. भारत सरकारचे आयात निर्यात धोरण सातत्याने शेतकरी विरोधाचे आहे. पाश्चिमात्य देशांनी प्रचंड अनुदाने देउन निर्यात केलेल्या शेतीमालामुळे भारतीय बाजारपेठा कोसळण्यात सुरुवात झाली आहे. [११] शेतीक्षेत्रामधील भांडवली गुंतवणूकीत मोठया प्रमाणात कपात केल्यामुळे भारतीय शेतीक्षेत्राचा विनाश ओढवला आहे. तसेच शेतीवरील सर्व अनुदानामध्ये टप्प्याटप्प्याने कपात केल्याने छोटया शेतकरी वर्गाची हलाखी वाढली आहे. कारण उत्पादन खर्च वाढतच आहे. जागतिकीकरणाच्या धोरणाचा भाग म्हणून शेतीमालाची खुलेआम आयात करण्यास मुभा देण्याच्या शासकीय धोरणामुळे शेतीमालाच्या किमती कोसळत आहेत. शासनाकडून आधारभूत किमतीला शेतीमाल खरेदी करण्याची कोणतीही यंत्रणा शासन उपलब्ध करुन देत नसल्याने जबरदस्त तोटा सोसून मिळेल. त्या किमतीला आपला शेतीमाल विकावा लागल्यामुळे कर्जबाजारी झाल्याने शेतकरी आत्महत्येकडे वळतो. जागतिकीकरणाच्या अंमलबजावणीनंतरच्या काळात भारतीय शेतीच्या समस्या कमी होण्याऐवजी अधिक तीव्र होत आहेत. जो शेतीमाल या देशात मुबलक प्रमाणावर पिकतो तो शेतीमाल या देशात खुलेआम बाहेरुन येत असल्यामुळे या देशातील शेतीवर अवलंबून असणारे छोटे शेतकरी, कामगार त्यांची कुटुंबे यांच्या भवितव्याचा प्रश्न बिकट झाला आहे. भारतीय शेतक—यांना जागतिक बाजारपेठ मिळणे तर दूरच पण स्वत:ची हक्काची अशी बाजारपेठ मिळेनाशी झाली आहे. स्वत:च्या मालकीच्या शेतजमिनीमध्ये उदरनिर्वाह होत नसल्यामुळे छोटे छोटे शेतकरी त्यांच्या जमिनीच्या तुकडयांवरुन हुसकले जात आहेत.

ॲटवूड डोनाल्ड १९६९ यांनी ग्रामीण दारिद्रयाचे अध्ययन करण्यासाठी पश्चिम महाराष्ट्रातील मालेगांव व सुपे या अनुक्रमे पाटबंधारे सिंचनव्यवस्था असलेल्या व तशी व्यवस्था नसलेल्या दोन गावांचे सर्वेक्षण केले. पाटबंधा—याच्या सुविधेमुळे उस उत्पादक शेतक—यांचाच फायदा झाला व छोटे शेतकरी मात्र गरीबच राहिले अशी समजूत अर्धसत्य वसल्याचे वास्तव या सर्वेक्षणातून त्यांना आढळून आले. अध्ययनाच्या आधारे त्यांनी असे निरिक्षण नोंदविले आहे की, मालेगांव हा दुष्काळी भाग होता. दुष्काळाशी सामना करण्यासाठी ब्रिटीश राजवटीत १८८५ पासून मालेगांव परिसराला डाव्या निरा कालव्यातून पाणीपुरवठा होउ लागला. उस हे रोखीचे पिक घेउन ब्रिटनला साखर पुरवठा करण्यासाठी हा कालवा नक्कीच निर्माण केलेला नव्हता. पाउस कमी पडला तरच शेतकरी पाटाचे पाणी वापरीत कारण हे पाणी विकत घ्यावे लागे. त्यामुळे या योजनेवर केलेला सरकारी खर्च देखील लवकर भरुन निघत नसे. याच दरम्यान

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{ Bi-Monthly} Volume-II, Issue-I June 2013

सासवडच्या काही माळी लोकांनी सोलापूरला स्वस्त जमिनी मिळतात हे लक्षात घेउन तिकडे स्थलांतर केले व त्या भागातील पाटाच्या पाण्याचा वापर करीत उस उत्पादन घेण्यास सुरुवात केली. त्यापैकी काही शेतक—यांनी एकत्र येउन १९३४ मध्ये सासवड माळी साखर कारखान्यांची उभारणी केली. ग्रामीण उस उत्पादकांच्या मालकीच्या या कारखान्याने इतर साखर कारान्याच्या निर्मितीस चालना दिली. १९५१ मध्ये नगर जिल्हयात प्रवरा नगर येथे विठठलराव विखे पाटील यांच्या प्रेरणेतून पहिला सहकारी साखर कारखाना उभ राहिला. १९५७ मध्ये मालेगांवर सहकारी साखर कारखाना उभा राहिला. मोठया शेतक—यांनी पाटबंधारे सुविधेचा लाभ घेत उस उत्पादनात सुरुवात केली. यामुळे मोठया शेतक—यांचा अधिक लाभ झाला असला तरी छोटे शेतकरी व भूमीहीन शेतमजूर याचा देखील विकास घडून येण्यास चालना मिळाली. मालेगांव सहकारी साखर कारखान्यामुळे मालेगांव परिसरात रोजगार उपलब्ध झाला. छोटया शेतक—यांनाही शेतीसाठी भांडवल उपलब्ध होउ लागले. ग्रामीण भागातील उसउत्पादक श्रीमंत शेतकरी अधिक श्रीमंत झाले व छोटया शेतक—यांचे, शेतमजुरांचे शोषण व दारिद्रय वाढू लागले हया गृहितकास ॲटवुड यांच्या अध्ययनाने छेद दिला. डॉ. बी.एस.बाविस्कर यांनी ॲटवूड यांना संशोधनासाठी विशेष सहकार्य केले होते. ॲटवूड यांनी लेखनात तसा आवर्जुन उल्लेख केला आहे.४० अर्थात हा साखर कारखान्यांचे काही प्रतिकूल परिणाम अनुभवास येउ लागले आहेत. कारखान्यांमधील मळीच्या साठयामुळे पर्यावरणाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. बागाईतदार, छोटे शेतकरी व शेतमजूर अशा प्रकारची सामाजिक विषमता निर्माण झाली आहे.

## समारोप

एकूणच महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योग हा एक महत्वाचा उद्योग असून महाराष्ट्रातील ग्रामीण भागाच्या विकासात या उद्योगाने महत्वपूर्ण भूमिका बजावली असल्याचे वास्तव वरील विवेचनातून स्पष्ट होते. राज्याचे अर्थकारण, राजकारण व समाजकारणास सहकारी साखर उद्योगाने प्रभावित केले आहे. ग्रामिण भागात कारखाना क्षेत्रात आधुनिक शेती व रोजगार निर्मितीस चालना दिली. ग्रामीण भागात उसउत्पादक बागाईतदार व शेअरहोल्डर शेतक—यांचा वर्ग निर्माण झाला. या शेतकरी वर्गाचा स्थानिक व राज्यस्तरीय राजकारणावर प्रभाव पडला. सहकारी साखर उद्योगातून आलेल्या नेतृत्वाने केन्द्रीय राजकारणावर देखील दीर्घकाळ आपली मजबूत पकड ठेवली आहे. कारखान्यामुळे प्रगत शेतीतंत्रज्ञानाची ओळख, शाळा, दवाखाने, सहकारी ग्राहक भांडारे, कृषी भांडारे, सहकारी पतसंस्था, पूरक व्यवसाय केंद्रे तसेच उच्च शिक्षण सुविधा, रस्ते बांधणी, जलसिंचन सुविधा उर्फ लिफट इरिगेशनची उपलब्धता इत्यादी सुविधांचा विकास

झाल्याने ग्रामिण परिसरात सुधारणांना चालना मिळाली. ग्रामीण भागात सहकारी साखर कारखान्यांच्या रुपाने समृध्दीची बेटे निर्माण झाली आहेत. महाराष्ट्रात सहकारी साखर उद्योगांमुळे पुढील आर्थिक व सामाजिक परिणाम घडून आले आहेत. देशाचे व राज्याचे अर्थकारण, राजकारण व समाजकारण प्रभावित करणारा साखर उद्योग हा एक महत्वाचा उद्योग आहे. या उद्योगात अनेक चढ–उतार आलेले आहेत. जागतिकीकरणामुळे अनेक नवी आव्हाने या उद्योगापुढे उभी ठाकली आहेत. मुळात शेतक–यांच्या हितासाठी 'ना नफा ना तोटा' या तत्वानुसार चालविला जाणारा हा उद्योग त्यातील किफायतशीरपणा संपल्यामुळे आज दुरावस्थेला तोंड देत आहे. सरकारी पॅकेजच्या टेकूवर कसाबसा तग धरुन आहे. खाजगी उद्योजकांनी चालविण्यास घेतलेले सहकारी साखर कारखाने सुस्थितीत चालू आहेत. मात्र जर साखर उत्पादन क्षेत्रात खाजगी उद्योजकांची मक्तेदारी निर्माण झाली तर उस उत्पादक शेतक–यांच्या शोषणाचे नवे पर्व सुरु होईल. साखरेचे भाव सामान्यांच्या आवाक्यात राहणार नाहीत. ग्रामीण भागात भांडवलशाहीचे दुष्परिणाम होउ लागतील म्हणूनच सहकारी साखर उद्योगात उणीवा असल्या तरी ग्रामीण भागाचा विकास करु शकणरा प्रत्यक्ष अप्रत्यक्ष स्वरुपात मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देणारा सहकारी साखर उद्योगाइतकाच प्रभावी उद्योग दुसरा नाही. उसाचा योग्य पुरवठा, उचित व्यवस्थापन , स्वस्त मनुष्यबळ व शाश्वत बाजार उपलब्ध झाल्यास साखर उद्योगाचे भवितव्य अतिशय उज्वल असल्याचे अनुभवाला येईल.

**संदर्भसुची :**

१. मराठे गो.स. २००४ , माजी कार्यकारी संचालक, राष्ट्रीय सहकारी साखर संघ, नवी दिल्ली महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योग स्वरुप व प्रश्न, पृष्ठाधार साहित्य.जानेवारी २२, सहकारी साखर उद्योग –संकट निवारण परिषद सांगली. पान क्र. १५,१६

२. ललवाणी माला,२००७, समाजप्रबोधन पत्रिका – जुले सप्टेंबर, 'महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योग सरकारी नियमनांचे शुक्लकाष्ठ' पान क्र.२७५

३. बावीस्कर बी.एस. २००३. , 'बदलता महाराष्ट्र साठोत्तरी परिवर्तनाचा मागोवा– डॉ.एन.डी.पाटील. गौरवग्रंथ. महाराष्ट्रातील साठोत्तरी सहकार चळवळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी,सातारा, संपादक भेळे भा.ल. , किशोर बेडकिहाळ, १६ जुलै पान क्र. ८०,८१

४. नारखेडे मधुकर,१९९३ 'भारतातील साखर उद्योग व नवीन आर्थिक धोरण– योजना, नोव्हेंबर, पान क्र. ८,९

५. जुगळे वसंत, २००९, 'उसाचा एफ.आर.पी.–नव्या वादाची सुरुवात,' दैनिक लोकसत्ता ९ नोव्हेंबर पान क्र. ४.

६. गोठोस्कर शा.म. २००९. 'साखरेचा भाव ५० रु.किलो होईल काय ? चित्रलेखा २८ सप्टेंबर पान क्र. १६,१७

७. पाटील गिरीधर, २००९ 'साखर उद्योग वाचवायचा असेल तर' साखर डायरी, संपादक – नरदे अजित, अनेकांत प्रकाशन, कोल्हापूर पान क्र. ५३३

८. पाटील एन.डी. २००२, जागतिकीकरण आणि भारतीय शेती, समाज प्रबोधन पत्रिका, जानेवारी मार्च पान २,९

९. ढवळे अशोक 'जागतिकीकरणाचा भारतीय शेतीला गळफास' – विद्यार्थी विशेषांक, महाराष्ट्र समिती, पुणे २००३